दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १०८ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# लाडक्या बहिणींसाठी आता नवा नियम महिलांना दरवर्षी करावी लागणार ई-केवायसी

## हयातीचे प्रमाणपत्रही सादर करावे लागणार; प्राप्तिकर खात्याचीही घेतली जाणार मदत

**मुंबई (वृत्तसंस्था): मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर पडणारा ताण कमी करण्यासाठी सरकार एक नवी नियमावली तयार करणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार, आता लाभार्थी महिलेची प्राप्तिकर खात्याकडील नोंद तपासली जाणार आहे. तसेच त्यांच्या उत्पन्नाची शहानिशा करण्यासाठी त्यांची दरवर्षी ई–केवायसी केली जाणार आहे. गरजू महिलांनाच या योजनेचा लाभ मिळावा यासाठी हा नवा नियम केला जाणार आहे.**

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेचा महायुतीमधील घटकपक्षांना चांगला फायदा झाला. पण आता या योजनेवर होणारा खर्च आवाक्यात आणण्याची ओरड होत असल्यामुळे सरकारने या योजनेच्या निकषांची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, सरकारने विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून लाभ घेणाऱ्या व ज्या महिलांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे अशा महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. विशेषतः लाभार्थी महिलेचे उत्पन्न अडीच लाखांहून जास्त आहे का? हे शोधण्यासाठी प्राप्तिकर विभागाचीही मदत घेतली जाणार आहे.



### हयातीचे प्रमाणपत्रही सादर करावे लागणार

सरकारच्या नव्या नियमानुसार, आता लाभार्थी महिलांना दरवर्षी जून महिन्यात बँकेत जाऊन ई–केवायसी द्यावे लागणार आहे. तसेच हयातीचा दाखलाही त्यांना बँकेकडे जमा करावा लागणार आहे. त्यानंतरच त्यांच्या खात्यावर लाडक्या बहिणीची रक्कम वर्ग करण्यात येणार आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील सुमारे २ कोटी ६३ लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या होत्या. अजूनही ११ लाख अर्जांची आधार क्रमांकाशी जोडणी प्रलंबित आहे. ही जोडणी पूर्ण झाल्यानंतर या लाभार्थ्यांना या योजनेचे पैसे मिळतील.

### ५ लाख लाभार्थ्यांना योजनेतून वगळले

दुसरीकडे, राज्य सरकारने १५ दिवसांपूर्वीच ५ लाख महिला लाभार्थ्यांना या योजनेतून वगळले होते. यात काही स्वतःहून अर्ज मागे घेतलेल्या महिलांचाही समावेश होता. याशिवाय संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचाही यात समावेश होता, असे राज्याच्या महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले होते. राज्यातील ६.५ लाख लाभार्थी हे नमो शेतकरी आणि लाडकी बहीण योजना, या दोन्ही योजनांचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. नमो शेतकरी योजनेतंर्गत पात्र शेतकऱ्यांना १००० रुपये मिळतात. त्यामुळे आता संबंधित लाभार्थ्यांना लाडकी बहीण योजनेचे केवळ ५०० रुपयेच देण्यात येतील.

# मुल तालुका सरपंच संघटनेचे आ.सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन

**मुल । प्रतिनिधी**

मुल तालुक्यातील २४ गाव ग्रीड योजना आणि प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याने तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कुशल व अकुशल कामे ठप्प असल्याने सरपंच संघटनेच्या वतीने आमदार सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देण्यात आले.ही समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी सरपंच संघटनेने केली. निवेदन देताना मुल तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष राहुल मुरकुटे, उपाध्यक्ष रणजित समर्थ, माजी सरपंच संजय येनुरकर, माजी उपसभापती अमोल चुधरी यांच्यासह तालुक्यातील अनेक सरपंच उपस्थित होते.




यावेळी हिमानी वाकुडकर, गोपिका जाधव, धीरज गोहने, प्रिती भांडेकर, यशवंत खोब्रागडे, रोशना लोडे, शारदा येनुरकर, वैशाली निकोडे, मीनल लेनगुरे, मेघा मडावी, दर्शना किंनाके, योगिता गेडाम, किरमे, ज्योत्स्ना पेदोर, अनुराधा नेवारे, शांताबाई गेडाम, साहिल येनगंटीवार, जगदीश बांगरे आदी सरपंच सहभागी झाले.सरपंच संघटनेने योजनेची पुनर्बहाली तातडीने करावी, अशी मागणी केली असून यावर सकारात्मक पावले उचलली जातील, असे आश्वासन देण्यात आले आहे.

# बैलजोडी शंकरपट हा शेतकऱ्यांकरिता आनंददायी महोत्सव–हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेतीमध्ये वर्षभर काबाडकष्ट उपसणाऱ्या देशाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाकरिता शंकरपट हा आनंद, उत्साह व विरंगुळ्याचा महोत्सव असून हा उत्सव ग्रामिण जनतेकरिता महत्वपूर्ण अशा मनोरंजनाचे साधन असल्याने या शंकरपटावरील बंदी हटवून न्यायालयाने शेतकऱ्यांचा सन्मानच केला असल्याचे राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी प्रतिपादीत केले.

कोरपना तालुक्यातील कवठाळा येथे दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित बैलजोडी जंगी इनामी शंकरपटाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. भाजपप्रणीत केंद्र व राज्य सरकारने शेतकरी हिताच्या अनेक महत्वाकांक्षी योजनांवर भर देवून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये क्रांती घडवून



आणण्याचा प्रयत्न चालविला असून या शेतकरीभिमुख योजनांचा प्रत्येक शेतकरीबांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन सुध्दा अहीर यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमात आयोजकांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून अहीर यांचे यथोचित स्वागत केले.या कार्यक्रमास सहउद्घाटक म्हणून कवठाळ्याच्या सरपंच्या सौ. रूपालीताई बोबडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा उद्योजक निलेश ताजने, चंद्रपूर मनपाचे माजी उपमहापौर अनिल फुलझले, भाजपा किसान मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष राजुभाऊ घरोटे, नांदगावचे उपसरपंच संजय चौधरी, जिनिंगचे प्रोप्रा हंसराज चौधरी व अन्य मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.श्री. निलेश ताजने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या शंकरपटाच्या आयोजनांमागील भुमिका विषद करून या कार्यक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेकरिता योगदान दिलेल्या सर्वांचे आभार मानले. हंसराज अहीर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या शंकरपट कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

# राज्यातील खटल्यांच्या तुलनेत न्यायमूर्तींची संख्याच अपुरी नाशिकरोड जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन

**मुंबई (वृत्तसंस्था):** राज्यात वाढती लोकसंख्या गृहीत धरता, खटल्यांची संख्या ही देखील वाढली आहे. त्यामुळे खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी शासनाला न्यायमूर्तींची अपुरी असलेली संख्या वाढविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांनी केले. नाशिकरोड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाचे रविवारी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालक न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. न्यायमूर्ती मकरंद कर्णिक म्हणाले, प्रत्येक व्यक्तीला वाटते की कोर्टाची पायरी चढू नये, मात्र समाजात वाद होत असल्याने न्यायपालिकेची पायरी चढावी लागते. न्यायमूर्ती, सरकारी वकील, वकील यांच्यावर कामाचा ताण वाढत असल्याने त्यांनाही खेळासारख्या इतर ॲक्टिव्हिटीमध्ये सहभाग मिळाला पाहिजे. समाजात अद्यापही बहुतांश नागरिक असे आहे की, त्यांना त्यांच्या स्वतःच्या अधिकारांबाबत माहिती नाही. प्रत्येक व्यक्तीला त्यांचे अधिकार माहिती व्हावे यासाठी न्यायपालिकेने देखील त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले. यावेळी नाशिकरोड वकील बार संघाचे अध्यक्ष सुदाम गायकवाड यांनी नाशिकरोड परिसराची गर्दी लक्षात इमारतीवर दोन मजल्यांना परवानगी द्यावी, तसेच न्यायालयासमोर असलेल्या शासकीय जागेमध्ये वकील चेंबर आणि पार्किंगसाठी जागा द्यावी अशी मागणी केली. न्यायमूर्ती संदीप मोरे, किशोर संत, मिलिंद साठे, श्रीचंद जगमलानी आदी उपस्थित होते.



# शिक्षक आमदार सुधाकर अडबाले धावले प्रकल्पग्रस्तांच्या मदतीला;निप्पॉनच्या जागेवरील खाजगी कंपनीचे काम पाडले बंद

## पुन्हा काम सुरु झाल्यास सामूहिक आत्मदहनाचा शेतकऱ्यांचा इशारा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निप्पॉन डेंड्रो प्रकल्पाकरीता संपादित करण्यात आलेल्या भद्रावती तालुक्यातील मौजा विजासन, रुयाड (रिठ), पिपरी (देश.), टोला, चारगांव, लोणार (रिठ), तेलवासा, कुनाडा, चिरादेवी व ढोरवासा या गावातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रशासनासोबत चर्चा सुरु असतानाच दुसरीकडे आज, दि. १७ फेब्रुवारी २०२५ ला पोलिस बंदोबस्ताचा वापर करुन खाजगी कंपनीने काम सुरु केले होते. प्रकल्पग्रस्तांमार्फत विरोध होऊ नये, यासाठी स्थानिक पोलिस प्रशासनाने प्रमुख चार प्रकल्पग्रस्तांना स्थानबद्ध करून ठेवले होते. या घटनेची माहिती शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांना मिळाली असता त्यांनी लगेच पोलिस स्टेशन गाठून स्थानबद्ध केलेल्या प्रकल्पग्रस्तांना बाहेर काढले व घटनास्थळी जावून कंपनीचे काम बंद पाडले.

या घटनेतून प्रशासनाचे दुटप्पी धोरण प्रकल्पग्रस्तांच्या नजरेस आले. परिणामी प्रकल्पग्रस्तांमध्ये रोष निर्माण झाला असून भविष्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी जिल्हा व तालुका महसूल तथा पोलिस प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे. सोबतच पुन्हा कंपनीचे काम सुरु झाल्यास सामूहिक आत्मदहनाचा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.

उपअभियंता म.औ.वि.म. उपविभाग, चंद्रपुर यांचे कार्यालय, चंद्रपुर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चंद्रपुर येथील भद्रावती औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आले आहे. सदर औद्योगिक क्षेत्राकरिता तालुक्यातील निप्पॉन डेंड्रो प्रकल्पाकरिता २८ वर्षे अगोदर संपादित करण्यात आलेली मौजा विजासन, रूयाळ, पिपरी, चारगाव, लोणार, तेलवासा, ढोरवासा, चिरादेवी, गवराळा येथिल जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ द्वारा



संपादीत केले आहे. सदर भुखंड क. बी–०१ क्षेत्र ४३,०००० चौरस मिटर मेसर्स ग्रेटा एनर्जी लिमिटेड भुखंड क. बी–३ क्षेत्र ६३७४८०० चौ.मी मेसर्स न्यु इरा क्लीनटेक सोल्युशन प्रा. लि यांना वाटप करण्यात आली असुन सदर जमीनीचा रक्कमेचा भरणा कंपनीने केलेला आहे.

चारगाव येथील सर्वे न.४६ क्षेत्र ७२.५६ हे.आर, लोनार रिठ येथील सर्वे न. ११० क्षेत्र १७६.५४ हे.आर, ढोरवासा येथील सर्वे न. ९१ क्षेत्र १६३. १६, रूयाड रिठ येथील सर्वे न. ५५ क्षेत्र ११९.७६ हे. आर, विजासन येथील सर्वे न. ५० क्षेत्र ११२.८० हे.आर एकुण सर्वे न. ३५२ क्षेत्र ६४४.८२ हे.आर. तसेच मे. ग्रेटा एनर्जी लि. यांना क्षेत्र ५५.०२ हे.आर ही जमिनीवरील अतीक्रमण काढुन कंपनीच्या ताब्यात देण्याकरिता आज दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ ला पोलीस बंदोबस्तात काम सुरु करण्यात आले. यासाठी पोलिस प्रशासन लाठी व हेल्मेटसह बंदोबस्ताचे तयारीने पोहोचले. प्रकल्पग्रस्तांचा विरोध होऊ नये म्हणून चार प्रकल्पग्रस्त प्रमुख वासुदेव ठाकरे, प्रवीण सातपुते, संदीप खुटेमाटे, आकाश जुनघरे यांना आज सकाळपासूनच स्थानिक पोलिस ठाण्यात स्थानबद्ध करुन ठेवले. आमदार सुधाकर अडबाले वेळेवर आले नसते तर प्रशासन व कंपनी डाव साधण्यात यशस्वी झाले असते. परंतु, आमदार अडबाले यांच्या दणक्याने कंपनीला काम बंद करावे लागले.प्रकल्पग्रस्त एकरी दहा लाख रुपये सानुग्रह अनुदान व प्रकल्पग्रस्त तथा प्रकल्पबाधित गावातील बेरोजगार यांना कौशल्यानुसार नोकरी देण्यात यावी, या मागणीसाठी चर्चा व बैठका करीत आहे. मात्र, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, मागण्यांची पूर्तता न करता, पोलिस बंदोबस्तात कंपनीचे काम सुरु करण्याची प्रक्रिया जिल्हा व तालुका प्रशासनाची दुटप्पी भूमिका दर्शवित असल्याचे यावेळी प्रकल्पग्रस्तांनी म्हटले आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्त व गावकरी उपस्थित होते.दरम्यान आमदार सुधाकर अडबाले यांची कंपनीचे व्यवस्थापक व उपविभागीय अधिकारी यांचेशी चर्चा झाली असता शेतकऱ्यांसह पुढील बैठक व मागण्यांची पूर्तता होईपर्यंत काम सुरु करणार नाही, असे सांगण्यात आले.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानचा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा थाटामाटात संपन्न

## विवेक कोल्हे यांच्या स्तुत्य उपक्रमाचे संत, महंतांकडून कौतुक

### शाही विवाह मिरवणुक

**सनई चौघड्यांची साथ, फुलांच्या व रांगोळीच्या साथीने सजलेले रस्ते, घोड्यावर आरुढ झालेले नवरदेव, बँडबाजा-संबळाची साथ, नाचण्याचा मनसोक्त आनंद घेणारी युवा पिढी, फटाक्यांची जंगी आतषबाजी, फुलांच्या अक्षदा, वऱ्हाडी मंडळींसाठी भोजनाचा शाही आस्वाद, उत्तम नियोजन, तुळशीला पाणी घालणाऱ्या रेणुकाताई कोल्हे व सवाष्णी, परमेश्वरी साथ हे सगळे पाहून विवाह सोहळ्याच्या शाही मिरवणुकीचा थाट कोपरगावकरांना पहावयास मिळाला.त्याच प्रमाणे विवेकभैय्या कोल्हे यांनी वर मिरवणुकीत नाचण्याचा आनंद घेत सर्वांचा उत्साह द्विगुणित केला.**




**कोपरगाव | प्रशांत टेके पाटील**

सेवा हाच धर्म मानून काम करणारे संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात कोपरगाव तहसील मैदान येथे पार पडला. प्रतिष्ठानचे संस्थापक युवानेते विवेक कोल्हे आणि युवासेवक यांनी अतिशय चोख नियोजन केले होते.आजवर शेकडो दाम्पत्यांचे संसार या सोहळ्याच्या माध्यमातून उभे राहिले असून श्रीमंतापासून ते गरिबापर्यंत सर्व क्षेत्रातील,विविध धर्मातील वधू वर यात सहभाग घेत विवाह पार पाडला जात असल्याची ख्याती या सोहळ्याची आहे.

संजीवनी युवा प्रतिष्ठान आणि सामाजिक काम हे एक समीकरण असुन सर्व समाजाच्या उन्नतीसाठी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी दिलेला लोकमंत्र सर्व कोल्हे कुटुंबीय व युवानेते विवेक कोल्हे सर्वार्थाने पुढे घेऊन जात असुन सर्वधर्मीय विवाह सोहळा काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती प.पू. रमेशगिरी महाराज यांनी केले.यावेळी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे,संजीवनी शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी संत महात्म्यांचे पुजन करून उपस्थीतांचे स्वागत केले. शुभआशीर्वाद देताना प.पू. रमेशगिरी महाराज पुढे म्हणाले की कन्यादान पवित्र संकल्प असून संजीवनी युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी आजपर्यंत शेकडो वधु-वरांचे विवाह पाडले असून एका अर्थाने अशा सोहळ्याच्या माध्यमातून पालकत्व स्विकारून त्यांच्या आनंदात भर घालत आहे हे विशेष. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी कोपरगांव विधानसभा मतदार संघाच्या उत्कर्षात अलौकिक योगदान दिले असुन त्यांचा वसा सर्व कोल्हे कुटुंब पुढे चालवत आहे ही अभिमानाची बाब आहे. कुंभमेळा पर्वणी काळात पाचवा सर्वधर्मिय विवाह सोहळा पार पडणे ही मोठी अनुभूती आहे, असे ते म्हणाले.सर्वांमध्ये ईश्वर असून सर्वधर्मीय समाजाला एकत्र करण्याचे काम विवेक कोल्हे व संजीवनी युवा प्रतिष्ठान करत आहे असे प्रतिपादन अडबंगनाथचे अधिपती ह.भ.प अरुणनाथगिरी महाराज यांनी केले. सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून माणुसकी आणि एकतेचा संदेश विवेक कोल्हे व त्यांचे सर्व स्वयंसेवक देत असल्याचे मौलाना निसार यावेळी बोलतांना म्हणाले, तर पुण्यकर्माचा कर्णधार विवेक कोल्हे आहे त्यांनी सर्वांना सोबत घेऊन जे काम केले आहे हे अतिशय कौतुकास्पद आहे असे भंते आनंद सुमंत श्री यांनी सांगितले.

या सोहळ्याचे प्रारंभी विवेकभैय्या कोल्हे प्रास्तविक करताना म्हणाले की, सर्व समाजामध्ये कळत नकळत आंतरिक तेढ काही प्रमाणात निर्माण झाली असुन सेवा हाच धर्म हा विचार घेऊन माणुसकीच्या नात्याने या माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या शिकवणीतून ती दरी कमी करण्यांसाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याने काम सुरू आहे. संकटे ही सर्वांवर येत असतात त्यात आशेचा किरण निर्माण करण्याचे काम संजीवनी युवा प्रतिष्ठान करत आहे.आजवर वृक्षारोपण,आरोग्य शिबिरे,मोफत फिरता दवाखाना,कोविड सेंटर,पूरग्रस्त भागात सेवा कार्य,एक राखी जवानांसाठी,गंगा आरती,प्रबोधन उपक्रम यासह हा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा सुरू ठेवत काम सुरू आहे. हा उपक्रम अनेकांच्या आर्थिक समस्येला उपाय ठरत आहे तर अगदी लाखोंचे पॅकेज घेणारे आय टी क्षेत्रातील वधू वर देखील यात सहभागी आजवर झाले आहेत. परमेश्वररुपी पाणी एकच आहे फक्त भांडी वेगवेगळी आहे त्यामुळे वेगवेगळ्या धर्मात देखील माणुसकीची शिकवण आहे त्या मार्गाने ऐक्य टिकले तर मोठी प्रगती करता येणे शक्य आहे असा बोधत्मक दाखला यावेळी शेवटी त्यांनी दिला.

यावेळी विविध अध्यात्मिक संस्थांनांचे महंत,संजीवनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, प्रणवदादा पवार यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते, विविध संस्थेचे चेअरमन,संचालक,आजी माजी पदाधिकारी,निमंत्रित मान्यवर, वऱ्हाडी मंडळी,नागरिक, युवासेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूल तालुक्यात वीरई पेठ येथे घराच्या स्लॅबवर गव्हानी घुबडांचे पिल्ले आढळले

**मुल | प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील वीरई पेठ येथील आकाश शामसुंदर गिरडकर यांच्या घराच्या स्लॅबवर ठेवलेल्या जळाऊ लाकडांच्या रिकाम्या जागेत गव्हानी घुबड (बार्न आऊल) पक्ष्याचा परिवार असल्याचे आढळून आले. हे लक्षात येताच आकाश गिरडकर यांनी संजीवन पर्यावरण संस्थेच्या सदस्यांना याबाबत माहिती दिली.

संस्थेचे उमेशसिंह झिरे व दिनेश खेवले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, चार पिल्ले व त्यांची आई त्या ठिकाणी असल्याचे दिसून आले. पिल्ले मोठे असल्याने ते लवकरच स्वच्छंद होणार असल्याने त्यांना तिथेच राहू द्यावे, अशी विनंती संस्थेच्या सदस्यांनी घरमालकाला केली. गिरडकर यांनी संस्थेच्या या विनंतीला सकारात्मक



प्रतिसाद दिला. मूल तालुक्यातील नागरिकांना अशा प्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास संजीवन पर्यावरण संस्थेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वैजापूर येथे भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हल गाडीवर दरोडा

## दोन लाखांची लूट, भाविकांना तासभर वेठीस

**वैजापूर | प्रतिनिधी**

कर्नाटकहून देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हल गाडीवर दरोडा टाकत दरोडेखोरांनी तब्बल दोन लाख एक हजार चारशे पन्नास रुपये किमतीचे रोख रक्कम व दागिने लुटून नेले. हा प्रकार १७ फेब्रुवारी रोजी पहाटे पाचच्या सुमारास वैजापूर तालुक्यातील भगाव ते बेलापूर मार्गावर घडला. चाकूचा धाक दाखवत दरोडेखोरांनी भाविकांना तासभर वेठीस धरले.

भाविकांचा टेम्पो ट्रॅव्हल कर्नाटकमधील चित्रदुर्ग येथून देवदर्शनासाठी निघाला होता. रविवारी सायंकाळी ओंकारेश्वरहून शिर्डीला




जात असताना वैजापूरच्या भगाव ते बेलापूर मार्गावर इरटीका कारने ट्रॅव्हल्सला अडवले. चालकाला उद्देशून तुम कैसे गाडी चला रहे हो, सीधा नहीं चला सकते क्या? असे म्हणत गाडीच्या काचा फोडून दरवाजा उघडण्यात आला.

त्यानंतर कारमधून २० ते २५ वयोगटातील चार जण उतरले. त्यांनी प्रवाशांना चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू हिसकावून घेतल्या. या लुटीमध्ये तब्बल २,०१,४५० रुपयांची हानी झाली. या प्रकरणी चालक मनीकंट हनुमंत आप्पा (वय ३४, रा. नेहरू नगर, चित्रदुर्ग, कर्नाटक) यांनी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांची ट्रॅव्हल गाडी क्रमांक घ.- ११ इ ४१०१ असून, त्या गाडीत १२ पुरुष आणि काही महिला प्रवास करत होते. भाविकांना कोणतीही शारीरिक इजा न करता दरोडेखोर कारमध्ये बसून पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नरवडे तपास करत आहेत. या घटनेमुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परराज्यातून येणाऱ्या यात्रेकरूंसाठी हा मार्ग धोकादायक ठरतो आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाने या घटनेचा तातडीने तपास करून गुन्हेगारांना अटक करावी, अशी मागणी होत आहे.

# महाराष्ट्र शासनाचा हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार डॉ.भाऊसाहेब नवले यांना प्रदान

**कोल्हार | प्रतिनिधी**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथील सहयोगी प्राध्यापक व हिंदी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब नवनाथ नवले यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा पं. महावीरप्रसाद द्विवेदी स्वर्ण पुरस्कार (२०२३-२४) मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.




महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा हा प्रतिष्ठित पुरस्कार मार्च २०२४ मध्ये चर्चगेट, मुंबई येथे झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आला. अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे, ज्येष्ठ सदस्य डॉ. सुधाकर मिश्र व उपाध्यक्ष डॉ. मंजू लोढा यांच्या उपस्थितीत डॉ. नवले यांना हा सन्मान देण्यात आला. या पुरस्कारात ३५,००० रोख रक्कम, सन्मानचिन्ह असे स्वरूप आहे.

डॉ. नवले यांना 'वैश्वीकरण और हिंदी का रोजगारोन्मुख परिदृश्य' या पुस्तकासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हिंदी साहित्याच्या प्रचार-प्रसारासाठी महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी विविध पुरस्कार देत असते. डॉ. नवले यांनी आतापर्यंत पाच पुस्तके प्रकाशित केली असून, ७९ हून अधिक संशोधन लेख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले आहेत. तसेच, अनेक चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन केले आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक असलेल्या डॉ. नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थी संशोधन करीत आहेत. त्यांनी २०१८ ते २०२१ दरम्यान महाविद्यालयाचे उप-प्राचार्य व परीक्षा अधिकारी म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे.या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, खा. डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. राजेंद्र विखे पाटील, डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. प्रदीप दिघे, डॉ. जयश्री सिनगर, डॉ. दीपक घोलप यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.डॉ. नवले यांच्या पुढील लेखन व शैक्षणिक कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# कोल्हारमध्ये महामार्गलगत अतिक्रमणांवर कारवाई; व्यावसायिकांमध्ये चिंता

**कोल्हार | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी महामार्गलगतच्या अतिक्रमणांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर कोल्हारमधील व्यवसायिकांना तीन दिवसात अतिक्रमणे हटवण्याच्या नोटिसा जारी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे व्यावसायिकांमध्ये घबराट पसरली असून काहींनी स्वतःहून दुकान रिकामी करण्यास सुरुवात केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बांधकाम विभागाचे अधीक्षक भारत कुमार बाविस्कर, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी महामार्गलगत अतिक्रमणांवर कठोर कारवाईचा निर्णय घेतला. उपविभागीय अधिकाऱ्यांना या मोहिमेचे समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

शनिवारी सकाळी प्रशासनाने महामार्गाचे मोजमाप करून प्रत्यक्ष व बंद असलेल्या आस्थापनांवर मार्किंग केले व नोटिसा लावल्या. केवळ तीन दिवसांची मुदत दिल्यामुळे व्यावसायिकांमध्ये अस्वस्थता



निर्माण झाली आहे. काहींनी स्वतःहून अतिक्रमण हटवण्यास सुरुवात केली असली तरी सर्वांनाच अद्याप नोटिसा मिळाल्या नसल्याने कारवाईबाबत अनिश्चितता कायम आहे. गेल्या काही वर्षांत अतिक्रमणविरोधी मोहिमांचे प्रयत्न अपयशी ठरले असले तरी यावेळी प्रशासन कठोर भूमिका घेणार असल्याचे संकेत मिळत आहेत. श्रीरामपूर, अहिल्यानगर आणि राहता येथे अतिक्रमणविरोधी कारवाईसाठी जेसीबी आणि बुलडोझरचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे कोल्हारमधील व्यवसायिकांनीही याची दखल घेण्याची गरज असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.

# पदाचा कार्यकाळ संपला, पण लोकसेवा अविरत-प्रदीप वाघ यांचे भावनिक मनोगत

**जव्हार | जितेंद्र मोरघा**

पंचायत समिती मोखाडाचे उपसभापती म्हणून कार्यभार संपत असला तरी लोकसेवेचे कर्तव्य सुरूच राहणार आहे, असे भावनिक शब्दांत प्रदीप वाघ यांनी आपल्या निरोप समारंभात मनोगत व्यक्त केले. पदाचा कार्यकाळ संपतो आहे, मात्र लोकांची सेवा करण्याचे कर्तव्य कधीच थांबणार नाही. अधिकार संपले असले तरी जबाबदारी कायम आहे. आज पहिल्यांदा काय बोलावे ते सुचत नाही, कारण या प्रवासात अनेकांचे सहकार्य



लाभले, असे वाघ यांनी सांगितले.

जिल्ह्यातील पंचायत समित्यांचा कार्यकाळ संपल्याने आयोजित निरोप समारंभात सभापती युवराज गिरंधले यांनी देखील आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा दिला. पदावर असताना लोकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. सर्वांच्या सहकार्याने हे शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले. यावेळी माजी उपसभापती लक्ष्मी भुसारा, अनिता पाटील, आशा झुगरे यांनीही आपले मनोगत मांडले. पंचायत समितीतील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक समन्वय समितीचे पदाधिकारी, एकात्मिक बालविकास अधिकारी, आरोग्य विभाग कर्मचारी आणि ग्रामसेवक उपस्थित होते. समारंभात उपस्थितांनी निवृत्त सदस्यांच्या योगदानाचा गौरव करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# वरसे येथे अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचा रंगतदार थरार-लहानग्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**रायगड | प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे येथे रविवारी (१६ फेब्रुवारी) लहान मुलांसाठी अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्थानिक ग्रामस्थ आणि क्रिकेट प्रेमींनी ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ६ ते १२ वयोगटातील मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रोठ, उडदवणे, भुवनेश्वर आणि वरसे येथील क्रिकेट संघांनी टेनिस बॉलवर अंडरआर्म पद्धतीने सामना खेळत क्रिकेटचा आनंद लुटला. विजेत्या संघांसाठी रोख बक्षिसे व चषक ठेवण्यात आले होते. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी वरसे येथील ज्युनियर क्रिकेट संघाने विशेष परिश्रम घेतले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) रोहा तालुका अध्यक्ष मधुकर पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.



# ९ मार्च रोजी नगरमध्ये खासदार मॅरेथॉन-शेतकऱ्यांचे हक्क आणि परवडणाऱ्या आरोग्यासाठी जनजागृती

**पारनेर । प्रतिनिधी**

खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात ९ मार्च रोजी सकाळी ६ वाजता खासदार मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले असून, याचा प्रमुख उद्देश शेतकरी बांधवांचे हक्क आणि परवडणाऱ्या आरोग्यासाठी जनजागृती करणे आहे.

मॅरेथॉनच्या ५ किमी आणि १० किमी अंतराच्या स्पर्धेसाठी नोंदणी बंधनकारक आहे, तर २.५ किमी वॉकाथॉनसाठी नोंदणी आवश्यक नाही. मॅरेथॉनची सुरुवात नगर-कल्याण महामार्गावरील द्वारका लॉन्स येथून होईल आणि केडगांव बायपास मार्गे पुन्हा द्वारका लॉन्स येथे समारोप होईल. ५




किमी आणि १० किमीच्या स्पर्धेत १२ वर्षांवरील पुरुष आणि महिला सहभागी होऊ शकतात, तर महिला, १२ वर्षांखालील मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी २.५ किमी वॉकाथॉन आयोजित करण्यात आला आहे.

**सुरक्षा आणि सुविधा**

नोंदणीकृत स्पर्धकांना टी-शर्ट, कॅप, मेडल आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेदरम्यान वैद्यकीय सुविधा, रूग्णवाहिका आणि आपत्ती व्यवस्थेची व्यवस्था केली जाईल. समारोपानंतर सर्व सहभागी स्पर्धकांसाठी नास्त्याची सोय केली जाईल.

**शेतकरी आणि रूग्णांसाठी संघर्ष**

खासदार नीलेश लंके शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी परवडणाऱ्या आरोग्यसेवांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांनी शेतमालाच्या हमीभावासाठी संघर्ष केला आहे तसेच आरोग्य योजनांमध्ये आर्थिक मदतीची मर्यादा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रतिष्ठानची आरोग्य सेवा**

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, मोफत डोळे तपासणी, चष्मे वाटप, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, स्तन कर्करोग तपासणी आणि इतर आरोग्य उपक्रम राबविले जातात. तसेच, गरीब रूग्णांना मुख्यमंत्री आणि पंतप्रधान सहाय्यता निधीतून मदत मिळवून दिली जाते.

**सामाजिक उपक्रमात सहभागी व्हा**

या मॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्य सेवांसाठी चळवळ सुरू केली जात आहे. अहिल्यानगरमधील नागरिकांना या सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# जव्हार तालुक्यात डाहोळ गावात वेल्स ऑन व्हिल्स संस्थेकडून ७४ ड्रम वाटप

**जव्हार । प्रतिनिधी**

जव्हार तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त डाहोळ गावात वेल्स ऑन व्हिल्स संस्थेच्या माध्यमातून ७४ कुटूंबांना पाण्याचे रोलर ड्रम वाटप करण्यात आले. या उपक्रमाची संकल्पना संस्थेचे अध्यक्ष शहाज मेनन यांनी मांडली होती.

संस्थेचे सदस्य नारायण गभाले यांनी डाहोळ गावाला भेट देऊन वस्तीची वस्तुस्थिती पाहणी केली. गावाच्या समस्यांवर लक्ष ठेवून, महिलांना पाणी आणण्यासाठी होणारा वेळ वाचवण्यासाठी आणि मुलींना शिक्षणासाठी अधिक वेळ मिळवून देण्यासाठी ड्रम वाटपाचे आयोजन करण्यात आले.



गावातील महिलांना पाणी आणण्यासाठी होणारा त्रास कमी होईल, आणि मुलींना शाळेत जाण्यासाठी आवश्यक वेळ मिळेल, असे नारायण गभाले यांनी सांगितले. यामुळे गावातील महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला, तसेच मुलांच्या चेहऱ्यावर वेगळाच उत्साह होता. यावेळी वेल्स ऑन व्हिल्स संस्थेचे नारायण गभाले, सुमित पाटील, संकेत बिडगर, रोशन भांगरे, रणजीत कारके आणि आदिवासी अस्मिता प्रतिष्ठानचे अध्यक्ष सरपंच सुदाम उंबरसाडा यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

# भाऊसाहेब चव्हाण यांना तंबाखूमुक्त शाळा पुरस्कार २०२४-२५ प्रदान

**ठाणे । रविंद्र धारवणे**


गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब तुकाराम चव्हाण यांना तंबाखूमुक्त शाळा अभियान प्रभावीपणे राबविल्याबद्दल नरोतम सखसेरिया फाउंडेशन आणि सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'तंबाखूमुक्त शाळा पुरस्कार २०२४-२५' प्रदान करण्यात आले. मुंबई प्रेस क्लब, मुंबई येथील एका कार्यक्रमात मा. राजीव निवतेकर (ख-ड), आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचा वितरण समारंभ झाला. या वेळी प्रमुख मान्यवरांमध्ये डॉ. विवेक पाखमोडे, सहसंचालक, रिटा परवडे, सहाय्यक संचालक, आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, नंदिना रामचंद्रन, मुख्य कार्यकारी अधिकारी, सलाम मुंबई फाउंडेशन,




आणि मनीष जोशी, नरोतम सखसेरिया फाउंडेशन यांचा समावेश होता. या पुरस्काराच्या अंतर्गत भाऊसाहेब चव्हाण यांना सन्मानचिन्ह आणि रु. २५,००० चा धनादेश प्रदान करण्यात आला.

चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात नाशिक जिल्ह्यातील चांदवड, कळवण, नांदगाव आणि सध्या ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तंबाखूमुक्त शाळा अभियान प्रभावीपणे राबवले, ज्यामुळे त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# कूकडी डावा कालव्याचे आवर्तन सुटले;शेतकऱ्यांनी मानले आभार



**पारनेर । प्रतिनिधी**

कूकडी डावा कालव्यातून रविवारी (दि. १६) दुपारी पाणी सोडण्यात आले असून पारनेर तालुक्यातील कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रात पाणी पोहचले आहे. या आवर्तनामुळे लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या तत्परतेमुळे निघोज परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

कुकडी कालव्याच्या लाभ क्षेत्रात पाणीटंचाई निर्माण झाली होती, ज्यामुळे चारा पिके, फळबागा आणि इतर शेतीमाल जळण्याची भीती निर्माण झाली होती. यावर त्वरित उपाययोजना म्हणून आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकऱ्यांच्या मागणीचे समर्थन करत जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली आणि ठरलेल्या आवर्तनाच्या पाच दिवस अगोदर पाणी सोडण्याची मागणी केली होती.

आमदार दाते सर यांच्या पाठपुराव्याला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ दखल घेतली आणि कुकडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता हेमंत धुमाळ यांना आवर्तन सोडण्याचे आदेश दिले. यानुसार रविवारी आवर्तन सोडण्यात आले.शेतकऱ्यांना हा आवर्तन अगोदर सुटल्याने मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्यात समाधानाचे वातावरण आहे.

# कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेच्या मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार

**सोलापूर । प्रतिनिधी**

कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांना उर्दू दिनाच्या निमित्ताने शाळेसाठी उत्कृष्ट काम केल्याबद्दल सोलापूर येथे पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोलापूर येथील उर्दू घरात आयोजित कार्यक्रमात करण्यात आला, जिथे सामाजिक कार्यकर्ते अल्लाउद्दीन शेख, अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुक जमादार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, उपाध्यक्ष शुकूर शेख, म.आयेशा मस्जिदचे विश्वस्त साजीद बेग, सामाजिक कार्यकर्ते नागेश उबाळे, आणि आलेम खान यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

१५ फेब्रुवारी रोजी उर्दू दिनानिमित्त सोलापूर येथील उर्दू घरमध्ये जिल्हा परिषद सोलापूर शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने



कार्यक्रम आयोजित करण्यात आले, त्यात शाळेच्या मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांचा शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सोलापूर कादर शेख यांच्या हस्ते विशेष पुरस्कार व सत्कार करण्यात आला.

कै. नामदेवराव जगताप नगरपरिषद प्राथमिक उर्दू शाळा इयत्ता आठवीपर्यंत होती. परंतु सरांच्या व मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या, शाळा व्यवस्थापन समितीच्या मेहनतीमुळे इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू झाले. उर्दू माध्यमाची ही स्थानिक स्वराज्य संस्थेची एकमेव शाळा आहे. सर्वांच्या मेहनतीमुळे आज मुलींच्या शिक्षणाला गती मिळणार आहे. शाळेतील विद्यार्थी, पालक, आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी जुबेर जनवाडकर यांना विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आहे.

# फुलसावंगी ते किनवट रोडवरील सेवालाल महाराज चौकात प्रतिमेचे अनावरण

**उमरखेड । प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील भिकू नगर येथे फुलसावंगी ते किनवट रोडवरील संत सेवालाल महाराज चौकात संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे अनावरण मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठित मान्यवर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सभापती




विजयराव महाजन, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पांडे, मदन पांडे, योगेश वाजपेयी, गणेश भगत, प्रकाश जाधव आणि ऊतम जाधव यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

संत सेवालाल महाराज यांच्या विचारांचे महत्त्व आणि समाज प्रबोधनातील त्यांचे योगदान यावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. त्यांच्या कार्यातून बंजारा समाजाच्या सशक्तीकरणाची प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले.

चौकात संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेच्या स्थापनेमुळे बंजारा समाजाच्या वारसा आणि संस्कृतीला एक नवीन आयाम मिळेल. तसेच, भावी पिढ्यांसाठी हा प्रेरणास्त्रोत ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# किंडरजॉय सी.एस.सी.बालविद्यालचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



**सोलापूर । प्रतिनिधी**

किंडरजॉय सी. एस. सी. बालविद्याल श्रीदेवीचामाळ, करमाळा या बालविद्यालयाचे स्नेहसंमेलन १५ फेब्रुवारी २०२५ रोजी अथर्व मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनाला पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत बालगोपाळांच्या कलागुणांना दाद दिली. स्नेहसंमेलनात बालविद्यालाच्या विद्यार्थ्यांनी देशप्रेम, सामाजिक बंधुभाव आणि पारंपरिक लोककलांचा कार्यक्रम गीतांच्या माध्यमातून सादर केला. रंगतदार कार्यक्रमाने बाळगोपाळांचे आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. लहान वयातच मुलांमध्ये स्टेज डेरिंग निर्माण करण्याचा हेतू साधताना, सर्व वयोगटातील मुलांनी स्नेहसंमेलनाचा खरा आनंद घेतला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. जयप्रकाश बिले (माजी प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा) व प्रा. गणेश करे पाटील (संस्थापक, यशकल्याणी समाजसेवा संस्था करमाळा) यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात प्रा. बिले व प्रा. पाटील यांनी संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि संस्थेला सहकार्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे कोरिओग्राफर सिद्धी कदम होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लवटे यांनी केले. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष धनराज कांबळे, सचिव राजश्री कांबळे, मीनाक्षी ढाळे, सुप्रिया जोगदंड, सिमा खराडे, बुराडे, श्यामली राखुंडे, अर्चना जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून प्रा. नागेश माने, लावंड , नरुटे, सोनावणे , कदम , विशाल शिंपी , असादे , नलिनी जाधव, डॉ. शेलार, डॉ. भोसले आणि सर्व पत्रकार बंधू उपस्थित होते.

# कष्ट आणि जिद्दीची कहाणी: जानाळ्याचा अमित पोरते बनला कर सहायक आणि महसूल सहायक

**मूल । रोहीत कामडे**

जानाळा येथील भूमिहीन मजुराचा मुलगा, अमित पोरते, आपल्या अथक परिश्रमाने आणि जिद्दीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पास करून कर सहायक आणि महसूल सहायक म्हणून सरकारी नोकरी मिळवण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या यशामुळे, त्याच्या कुटुंबीयांच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू तर आहेतच, पण त्याच्या संघर्षातून प्रत्येकाला प्रेरणा मिळत आहे.

अमितने आपल्या जीवनातील प्रत्येक अडचणीवर मात करून हा यशस्वी प्रवास पार केला. त्याने शिक्षणासाठी आलेल्या आव्हानांना तोंड दिलं, आणि घरची परिस्थिती अवघड असतानाही आपल्या कुटुंबासाठी एक नवीन आशेचा किरण तयार केला. त्याच्या संघर्षाची ही कहाणी प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

गावातील प्राथमिक शाळेतून सुरू झालेल्या शिक्षणाच्या प्रवासात, त्याने मोलमजुरी करून स्पर्धा परीक्षेची तयारी केली. अखेर त्याच्या मेहनतीचा फळ म्हणून, तो आज कर सहायक आणि महसूल सहायक म्हणून सर्वांच्या नजरेत आला आहे.अमितच्या यशात एक गोष्ट स्पष्ट आहे - जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर, कोणत्याही कठीण परिस्थितीवर मात केली जाऊ शकते.



## पदाधिकाऱ्यांना कानमंत्र: प्रवेश व नियुक्ती सोहळा

# चांगल्या कामाच्या पाठीशी उभा राहीन पण गैरप्रकार खपवून घेणार नाही-आ.गुट्टे

**गंगाखेड । प्रतिनिधी**

मतदारसंघासह जिल्ह्यातील गरजू नागरिकांसाठी योग्य ते उपक्रम राबवून त्यांना मदत करा. आपापल्या भागातील समस्या, अडचणी आणि प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही केव्हाही हाक द्या, त्या ठिकाणी कायम तत्पर असेन. कारण, आपल्या सर्वांना मिळून विकासाचा पाया अधिक सक्षम करायचा आहे. त्यामुळे पदाधिकारी म्हणून जनसंपर्क वाढवा. उपक्रम राबवा. लोकहिताची कामे करा. जेष्ठ नागरिकांना सहकार्य करा. लाडक्या बहिणींचे प्रश्न सोडवा. निराधारांना आधार द्या. तुमच्या चांगल्या कामाच्या पाठीशी उभा राहीन, पण पदाचा गैरवापर करून तुम्ही जर कोणता गैरप्रकार करीत असाल, तर तो खपवून घेणार नाही, अशा शब्दात आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कानपिचक्या दिल्या. शहरातील राम-सीता सदन येथे आयोजित प्रवेश व नियुक्ती कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी नगर परिषदचे माजी नगरसेवक बालाजी शेटे, माजी नगरसेवक तुकाराम तांदळे, बन्सी काबलिया आणि संदीप केंद्रे यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी गुट्टे काका मित्र मंडळात जाहीर प्रवेश केला. तसेच गरजू आणि गरीब जनतेसाठी वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम राबवण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध असल्याचे सांगितले.



पुढे आ. डॉ. गुट्टे म्हणाले की, मित्र मंडळ पदाधिकारी म्हणून मिळालेल्या संधीचे आपल्या कामातून सोने करा. ग्रामीण व शहरी भागातील विकासाला चालना देण्यासाठी कृतीशील कार्यक्रम हाती घ्या. आपल्या चांगल्या कामांच्या पाठीशी कायम उभा राहीन. शेवटी, विकास आणि जनसेवा हेच आपले उद्दिष्ट आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त नागरिकांना फायदेशीर ठरतील अशा योजना, कार्यक्रम आणि उपक्रम राबवा. तुमच्या कल्पना आणि योजनांचे नेहमी स्वागत केले जाईल. तसेच नेहमी लोकहिताची भूमिका घेऊन काम करा. जनतेची सेवा करताना प्रामाणिकपणा जपा. पारदर्शक आणि गतिमान कारभार करा, असेही आवाहन आ. डॉ. गुट्टे यांनी केले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रीय समाज पक्ष प्रदेश सरचिटणीस म्हणून नंदकुमार पटेल, गुट्टे काका मित्रमंडळाचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्षपदी इकबाल चाऊस, विधानसभा अल्पसंख्यांक अध्यक्षपदी शोहेब शेख, अल्पसंख्यांक शहराध्यक्षपदी अझहर शेख, दलित आघाडी तालुकाध्यक्ष म्हणून नितेश खंदारे, सोशल मीडिया शहर प्रमुख म्हणून अमोल दिवाण याची एकमताने निवड करण्यात आली. तसेच नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना आ. डॉ. गुट्टे यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप आळनुरे तर सूत्रसंचालन पिराजी कांबळे यांनी केले. आभार अकबर सय्यद यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्ष व मित्रमंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रफुल पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त ११३ नागरिकांना मोफत चष्मे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी रुग्णांच्या डोळ्याची तपासणी करीत ११३ गरजू रुग्णांना मोफत चष्मे आणि औषध वाटप केले.




आज झालेल्या कार्यक्रमात डोळे तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी उपस्थित रुग्णांना डोळ्याची काळजी घेणे बाबत योग्य मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, विधानसभा अध्यक्ष सुनील काळे, माजी सरपंच अमोल ठाकरे, युवक शहर अध्यक्ष अभिनव देशपांडे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष सुजित उपरे, कामगार विभाग जिल्हाध्यक्ष संजय शेजुळ, वैद्यकीय विभाग जिल्हाध्यक्ष पंकज ढेंगारे, ग्रामपंचायत सदस्य अनुकुल खन्नाडे, अनिकेत सुखदेवे, प्रशांत वानखेडे, संदीप सुखदेवे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अनिकेत सुखदेवे, रुकेश गेडाम, प्रशांत वानखेडे, इम्रान अली, संदीप सुखदेवे, मिलिंद जगदाळे, विशाल शेंडे, अनिकेत आदे, अमित कांबळे, वैभव आगलावे, प्रविण गोंगले, सुहास दहेगावकर, जिवन दहेगावकर, निरज रामटेके, ज्योती वानखेडे, सुनिता भजभुजे, अनुराधा साव, स्नेहा दुधकुरे, सुनिता कमलवार यांनी परिश्रम घेतले.

# संत शिरोमणी गुरु रविदास जयंती उत्साहात साजरी

**कोरपना । प्रतिनिधी**

श्री. संत शिरोमणी गुरु रविदास महाराज बहुउद्देशीय समाज मंडळ, नांदाफाटा यांच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास जयंती भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई नवले होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच परिषद मुंबईचे जिल्हा समन्वयक तथा बिबी येथील उपसरपंच आशिष देरकर, माजी सभापती संजय मुसळे, नांदा येथील सरपंच मेघा पेंदोर, उपसरपंच पुरुषोत्तम आस्वले, अभय मुनोत, पुरुषोत्तम निब्रड, पोलिस पाटील वैशाली भोयर उपस्थित होते.

संत रविदास महाराजांच्या सामाजिक समतेच्या विचारांवर मान्यवरांनी प्रकाश टाकला. त्यांच्या शिकवणुकीचा अवलंब करून समाजात एकात्मता निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे सदस्य शंकेश लिपटे, अरविंद इंगोले, प्रकाश शिवणकर, मोरेश्वर वाराडकर, मनोज भोयर, पारस वाढई, रामभाऊ धुळे, वासुदेव पंचवटे, कवडू टिकले, संतोष वाढई आणि इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला असून, उपस्थितांनी संत रविदास महाराजांच्या विचारांना अनुसरून सामाजिक एकता आणि बंधुभाव जोपासण्याचा संकल्प केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे सचिव गोकुल बनसोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंडळाचे अध्यक्ष सतीश लांडे यांनी केले.

# सालदरा येथे शालेय तथा जिवन उपयोगी साहित्य वितरण सोहळा संपन्न

## ग्रामविकासात स्वयंसेवी संस्थानी पुढाकार घ्यावा : जया अंभोरे

**सालदरा । प्रतिनिधी**

निर्मीक ग्रामीण विकास व बहुउद्देशिय संस्था, ग्रामपंचायत सालदरा यांच्यातर्फे १६ फेब्रुवारी रोजी आयोजित शालेय तसेच जिवनोपयोगी साहित्य वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात ग्रामीण विकास व बहुउद्देशिय संस्था नागपुर यांच्या संचालिका जया सतिश अंभोरे यांनी समाजधुरीण व स्वयंसेवी संस्थांची महत्त्वाची भूमिका मांडली. त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांपर्यंत शासनाच्या योजनांची पोहोच आणि मार्गदर्शन मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील सुशिक्षित ग्रामस्थांची सक्रियता अनिवार्य असल्याचे सांगितले.



या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, आर्वी येथील ज्येष्ठ समाजसेवी श्यामसुंदर राठी, ऑल इंडिया शास्त्री सोशल फॉरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, कारंजा (घा) येथील नायब तहसिलदार चंद्रशेखर वालके, पंजाब नेशनल बँकेचे माजी अधिकारी दिलीप मसने, निम्न वर्धा प्रकल्प विभागाचे उप-कार्यकारी अभियंता अमोल आठवले यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरपंच पुंडलिकराव साठे यांच्या हस्ते साहित्य वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी १२५ गरजू महिलांना जिवनोपयोगी वस्त्रं आणि ११५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दौलत धोरणाडे, गुरूदेव चोरआमले, प्रेमदास सयाम, प्रकाश शिरभाते, सुरेश कुंभेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# रायगड जिल्ह्यात पहिल्यांदाच तिहेरी तलाक गुन्हा दाखल

## पतीसह पाच जणांविरोधात कारवाई

**महाड । प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वहूर मोहल्ल्यात तिहेरी तलाक प्रकरणातील गुन्हा दाखल झाला आहे. पीडित महिलेनं आपल्या पतीसह पाच जणांविरोधात महाड एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

घटना अशी घडली की, आरोपी मुस्लिम नवरदेव ने पहिली पत्नी असतानाच दुसरे लग्न करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी संपूर्ण विषय न्यायप्रविष्ठ असतानाच आरोपीने बाशिंग बांधून दुसरे लग्न करण्याचा प्रयत्न केला, ज्याची माहिती मिळताच पीडित महिलेनं 'एका लोकल न्यूज चॅनेल'शी संपर्क साधला, ज्यांनी त्वरित बातमी प्रकाशित केली. या बातमीमुळे आरोपी व त्याच्या कुटुंबात पळापळ झाली, परंतु नवरदेवने दुसरे लग्न दुसऱ्या ठिकाणी केलं.

नैना अब्दुल रहमान इसाने यांची वडीलांच्या वडिलांच्या फ्लॅटवर आणि एक करोड रुपयांच्या मागणीबाबत



सासरच्यांकडून त्रास सहन करावी लागला. घरातील इतर आरोपींनी तिला मानसिक व शारीरिक छळ केला आणि तिहेरी तलाक देऊन घराबाहेर काढले.आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमानुसार आणि मुस्लिम महिला विवाह संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करत आहेत. भाजप महिला जिल्हाध्यक्षा डॉ. मंजुषा, महामुणकर, बिरवाडी महिला प्रमुख मानसी पवार यांचा सक्रिय सहभाग आहे.

## बॉलीवूड अभिनेत्री रविना टंडन यांनी केले सर्वांना आपलेसे

# क्रीडा, संस्कृती व एकतेचा संगम म्हणजे घुग्घूसचे महिला महोत्सव-आ.मुनगंटीवार

## मा.आ.श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार क्रिडा व सांस्कृतिक महिला महोत्सवाची घुग्घूस येथे शानदार सांगता

**घुग्घुस । प्रतिनिधी**

स्थानिक आ. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र तथा प्रयास सखी मंचच्या वतीने काल (दि. १५)स्थानिक बांगडे ले-आउटवर मा. आ. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार क्रिडा व सांस्कृतिक महिला महोत्सव शानदार आयोजन करण्यात आले. या महोत्सवाला सुप्रसिद्ध बॉलीवुड अभिनेत्री रवीना टंडन यांची उपस्थिती व घुग्घुसच्या महिलाशक्तीची उत्साहपूर्ण गर्दी लक्षणीय ठरली. घुग्घुस शहराशी १९९५ पासूनचे नाते आहे. या भागाच्या विकासासाठी मी कायम प्रयत्नशील राहिलो आहे. मी मंचावर येतांना रविनाजींचे लोकप्रिय गाणे वाजवले गेले, अगदी त्याचप्रमाणे ये घुग्घूस शहर भी बड़ा है मस्त मस्त असा उल्लेख करत महीलाशक्तीच्या उत्साहपूर्ण व अभुतपुर्व गर्दीत साजरा होणारा हा दोन दिवसीय महोत्सव म्हणजे क्रिडा, संस्कृती व एकतेचा संगम आहे. आयोजकांचे उत्तम नियोजन व महिलाभगीनींचा सक्रिय सहभाग हेच या महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे असे गौरवोद्गार आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी बोलताना काढले.

अभिनेत्री रविना टंडन यांनी या शानदार कार्यक्रमात मला बोलावल्याबद्दल आमदार मुनगंटीवार यांचे आभारी असल्याचे सांगत हा कार्यक्रम म्हणजे महिला सक्षमीकरण, समानता आणि सांस्कृतिक वारसा यावर भर देणारा आहे. आदरणीय सुधीरभाऊ म्हणजे सेवेचे व्रत घेऊन काम करणारे नेते आहेत. त्यांच्या कामाचा आलेख सर्वांनाच प्रेरणा देतो. त्यांनी मला याठिकाणी बोलावून आमदार देवरावजी भोंगळे यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या सेवा केंद्राचे सेवाकार्य जाणून घेण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या महिलांच्या सामर्थ्यावर भाष्य करत त्यांनी सांगितले की, महिलांमध्ये स्वतःची क्षमता ओळखण्याची आणि ती वापरण्याची ताकद असते, ती क्षमता ओळखून महिलांनी आयुष्यात स्वतःला सिद्ध करावे असे त्या म्हणाल्या. सुधीरजी मुनगंटीवार यांच्या नावाने होणारा आणि




माझ्या लाडक्या नणंदबाईंना पर्वणी असलेला हा महोत्सव केवळ कला आणि संस्कृतीचा कार्यक्रम नाही, तर महिलांच्या सामर्थ्य, सृजनशीलता, आणि सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनाचा एक प्रतीक आहे. आदरणीय सुधीरजीचे सेवाकार्य सबंध महाराष्ट्र जाणतो. त्यांच्या याच सेवाकार्याला पुढे नेण्याचे काम आमदार देवराव भोंगळे हे करत आहेत. सरपंच ते आमदार असा प्रेरणादायी प्रवास करणारे श्री. देवराव म्हणजे मुर्ती लहान पण किर्ती महान असे व्यक्तीमत्व आहेत. त्यांनी नेहमीच सुधीरजींच्या मार्गदर्शनात या भागात सेवेचे व्रत घेऊन काम केले आहे. महिलांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते मंच उपलब्ध करून देत आहेत हे निश्चितचं कौतुकास्पद आहे. त्यांच्या सेवाकार्याला तसेच या नेत्रदीपक महोत्सवाला माझ्याही भरपूर शुभेच्छा. असे शुभेच्छापर मनोगत आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या अर्धांगिनी सपना मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला मंचावर आयोजक तथा आमदार देवराव भोंगळे, भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, प्रयास सखी मंचच्या मार्गदर्शिका अर्चना भोंगळे, अध्यक्षा किरण बोढे, भाजयुमोचे अमोल थेरे, विनोद चौधरी, गणेश कुटेमाटे, दिनेश बांगडे, सुनील बाम, चिन्नाजी नलभोगा, सुरेंद्र भोंगळे, हेमंत कुमार, हसन शेख, श्रीकांत सावे, विवेक तिवारी, तुलसीदास ढवस, विनोद जंजर्ला, कोमल ठाकरे, संजय जोगी, गणेश राजूरकर, योगेश घोडके, मारोती मांढरे, विजय माथणकर, धनराज पारखी, प्रमोद भोस्कर, असगर खान, रवी घोडके, सौरभ घोडके, उमेश दडमल, रोशन अतकारे, सिनू कोत्तुर आदींची उपस्थिती होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .